॥ श्रीगणेशायनमः ॥

हॉटेल बळीराजा

फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अँण्ड फास्ट फूड

* साऊथ इंडियन
* पंजाबी * चायनीज
* तंदूर * महाराष्ट्रीयन

नाष्टा व जेवणाची उत्तम सोय

संपर्क : 8999854954, 8668738334

पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड



॥ श्री दत्त कृपा ॥

सायं.दैनिक बीड

# प्रारंभ

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे



हॉटेल गौरव

रेस्टो बार, डिलक्स रूम

एसपी ऑफीससमोर, बार्शी रोड, बीड

प्रो.प्रा.नितीन खोड

एक वेळ आवश्य भेट द्या



बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक २१० ■ शुक्रवार दि. ०२ ऑक्टोबर २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu-210 ■ Friday, 02 October -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


# कुर हत्या करणारा आरोपी वाल्मीक कराडचे लाड पुरवतय तरी कोण?



## वाल्मिक कराडला 'व्हीआयपी' सुविधा? जिल्हा कारागृहाची उच्चस्तरीय चौकशी कराच.!

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : जिल्हा कारागृह गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने चर्चेत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि अन्य आरोपींना कारागृहात विशेष सुविधा मिळत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कारागृहातील दोन कर्मचाऱ्यांवर नुकतीच निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, काही कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसाही बजावण्यात आल्या आहेत. मात्र, या निलंबनाचे अधिकृत कारण कर्तव्यातील हलगर्जीपणा व अनियमितता असल्याचं स्पष्ट कारण देण्यात आला आहे तर दुसरीकडे नुकतीच पत्रकार परिषद घेऊन खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मीक करा जेलमधून कशी कट शिजून टोळी चालवतो याची ऑडिओ क्लिप व्हायरल केली आहे. यानंतर परत एकदा जिल्हा कारागृहावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. यामुळे एकदा जिल्हा कारागृहाची उच्चस्तरीय चौकशी कराच म्हणजे सत्य सर्वांसमोर येईल अशी मागणी होत आहे.

दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मिक कराडकडून कारागृहातून कारवाया सुरू असल्याचा आरोप करत कथित ऑडिओ क्लिपचा मुद्दा उपस्थित केला आहे. या आरोपांनंतर कारागृह प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, कारागृह प्रशासनाने काही आरोप फेटाळून लावत कैद्यांना नियमानुसार 'अॅलन कॉल'ची सुविधा असल्याचे स्पष्ट केले आहे.

यापूर्वीही विशेष सुविधा मिळत असल्याच्या तक्रारीनंतर पुणे आणि संभाजीनगर येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने बीड जिल्हा कारागृहाची तपासणी केली होती. सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी केली होती पण आता या व्हिडिओ क्लिप मुळे परत एकदा उच्चस्तरीय चौकशीची मागणी होत आहे. जर खरच व्हीआयपी सुविधा मिळत असेल तर मात्र येथील जेलर सह इतरांवर नियमाप्रमाणे कठोर शासन व्हावे अशी मागणी होत आहे. जर आरोपांमध्ये तथ्य नसेल तर आरोप करणाऱ्यांवर सुद्धा कारवाई करा कारण की सत्य सर्वांसमोर आलं पाहिजे.त्यामुळे आता बीड जिल्हा कारागृहात नेमक्या कोणत्या सुविधा कोणत्या कैद्यांना मिळतात, नियमांचे उल्लंघन झाले आहे का, कारागृहातील कर्मचाऱ्यांची भूमिका काय आहे आणि बाहेरील व्यक्तींचा काही हस्तक्षेप आहे का, याची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. वाल्मिक कराडला खरंच नियमबाह्य सुविधा मिळतात का? या आरोपांमध्ये तथ्य किती आणि कारागृह प्रशासनाची भूमिका नेमकी काय? याचा तपास अधिकृत चौकशीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# गांधी जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा स्वच्छतेचा संदेश कृतीतून

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. स्वच्छता, स्वच्छ परिसर आणि निरोगी जीवनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभागी होत कार्यालय परिसराची स्वच्छता केली.



यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत स्वच्छता अभियानाला हातभार लावला. स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गांधी जयंतीच्या निमित्ताने प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभागी होत *'स्वच्छ परिसर, निरोगी जीवन आणि सुंदर बीड'चा संदेश दिला.

# 'स्वच्छता हीच सेवा'; गांधी जयंतीनिमित्त बीड शहरात भव्य स्वच्छता अभियान

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त बीड नगरपरिषदेच्या वतीने शहरात विशेष 'स्वच्छता हीच सेवा' अभियान राबविण्यात आले. या अभियानात नगराध्यक्ष प्रेमलता पारवे यांनी स्वतः सहभागी होत परिसराची स्वच्छता केली आणि स्वच्छतेचा संदेश कृतीतून दिला.

'स्वच्छ बीड, सुंदर बीड' घडवण्यासाठी नागरिकांनीही स्वच्छता अभियानात सहभागी होऊन शहर स्वच्छ ठेवण्याचा





संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या स्वच्छता अभियानाला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मांडूरके, स्वच्छता सभापती शेख निजाम, प्रतिनिधी शेख मुजीब, नगरसेवक, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाच लाख रुपयाचा धनादेश वटला नाही म्हणून आरोपी फुलचंदलुचारे यास सहा महिने शिक्षा व धनादेश रक्कम

बीड । प्रतिनिधी

फिर्यादीची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी व आरोपी हे एकाच कॉलनीमध्ये राहत होते त्यामुळे फिर्यादी व आरोपीची ओळख झाली व सदर ओळखीचे रूपांतर मैत्रीमध्ये झाले फिर्यादी व आरोपीचे मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे दोघे सतत एकमेकांच्या घरी येत जात असत मागील काही वर्षांपूर्वी फिर्यादी हा सैन्य दलातून निवृत्त झाला व कायमस्वरूपी बीड येथे वास्तव्यास आला त्यानंतर फिर्यादी हा सैन्यदलातून मिळालेल्या मोठ्या रकमेची योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्याच्या शोधात होता हे फिर्यादीने आरोपी सांगितले होते. त्यानंतर फिर्यादी व आरोपी दोघे मिळून फिर्यादीस योग्य ठिकाणी रक्कम गुंतवण्यासाठी घर जागा जमीन शोधत होते मे २०२१ महिन्याच्या शेवटच्या



आठवड्यामध्ये आरोपीने फिर्यादीस रक्कम रुपये ५,००,०००/- ( पाच लाख) हात उसने मागितले त्यावेळी फिर्यादी हा आरोपीसोबत असलेल्या मैत्रीपूर्ण संबंध व विश्वासाखातर रक्कम देण्यास तयार झाला व फिर्यादी हे आरोपीस म्हणाले की एकदम एवढी रक्कम एकाच दिवशी देता येणार नाही मी माझे पैसे गुंतवलेले आहेत आठ पंधरा दिवसात पैशाची तजवीज करतो व जसे जमतील तसे देतो त्यानंतर फिर्यादीने दिनांक ०२/०६/२०२१ रोजी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया येथून रक्कम रुपये २०००००/-( दोन लक्ष) दिनांक १६/०६/२०२१ रोजी २०००००/-( दोन लक्ष) रुपये व १९/०६/२०२१ रोजी १,००,०००/- (एक लाख) रुपये असे वेळोवेळी काढून आरोपीने मागितलेली एकूण रक्कम ५,००,०००/- (पाच लाख) रुपये हात

# गेवराई तालुक्यात तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वडगाव (सुशी) येथील केशव बाबुराव कदम (वय ४२ वर्षे) या शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. मंगळवारी सायंकाळी ही घटना घडली. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान २४ सप्टेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला.

केशव कदम हे मागील १५ ते २० दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून अस्वस्थ असल्याची माहिती नातेवाईकांकडून मिळत आहे. आरक्षणाच्या मागणीवर अनेक



वर्षांपासून आंदोलन सुरू असून, या प्रश्नावर ठोस तोडगा निघालेला नसल्याने ते वारंवार चिंता व्यक्त करत असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, सततची नापिकी, शेतीतील

# साहिल वाकोडे यांना न्याय मिळालाच पाहिजे:पप्पू कागदे

**प्रा.सुर्यनारायण डुल्ला व शिरीष केदारे यांना तात्काळ अटक करण्यात यावी**

बीड । प्रतिनिधी

मुंबईतील आयआयटी पवई येथील एनर्जी सायन्स इंजिनिअरिंगचा विद्यार्थी साहिल वाकोडे वय २२ वर्षे याने सेंटरमधील जाती आधारित भेदभाव व छळाला कंटाळून दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी वसतिगृहाच्या खोलीत आत्महत्या केली होती. साहिल वाकोडे यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून या प्रकरणातील दोषी प्रा. सुर्यनारायण डुल्ला व शिरीष केदारे यांना तात्काळ अटक करण्यात यावी. अशी मागणी युवा रिपाइं




प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषणास बसलेल्या साहिल वाकोडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन केली. यावेळी सचिन मोहिते, रुकेश भालेराव यांच्यासह रिपाई पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबई आयआयटी सेंटर पवई येथे साहिल वाकोडे हा एनर्जी

# गेवराईत भव्य शोभायात्रेने होणार रामकथा आणि किर्तन महोत्सवाचा शुभारंभ

**माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांच्या ८९ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन**

गेवराई । प्रतिनिधी

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने शनिवार, दि.३ ऑक्टोबर रोजी गेवराई शहरात सकाळी १० वाजता भव्य शोभायात्रेने श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य किर्तन महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर हे शोभायात्रेत सहभागी होणार आहेत. दररोज ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, श्रीराम कथा, भजन संध्या आणि महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकारांचे किर्तन असे भरगच्च कार्यक्रम



दि.३ ते १० ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत. भाविक भक्तांनी सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त शिवनगरी, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे शनिवार, दि.३ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर दरम्यान श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादाप्रमाणे याहीवर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यावर प्रेम करणाऱ्या सहकाऱ्यांच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता भव्य शोभायात्रेने महोत्सवाचा शुभारंभ होणार असून शनिवार, दि.१० ऑक्टोबर रोजी महाप्रसादाने सांगता होणार आहे. दररोज सकाळी ७ ते १० या वेळेत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीराम कथा, सायंकाळी ६ ते ८ या वेळेत भजन संध्या आणि रात्रौ ८ ते १० या वेळेत किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार यानिमित्ताने गेवराईत

# जिल्हा रुग्णालयासमोरील दुभाजक तोडून आपत्कालीन रस्ता खुला करा!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयात केवळ बीड शहरातूनच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातून अपघातग्रस्त, हृदयविकाराचा झटका आलेले, विषप्राशन केलेले तसेच अन्य गंभीर अवस्थेतील रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. अशा रुग्णांना रुग्णालयात पोहोचविताना प्रत्येक मिनिट महत्त्वाचे असते. मात्र, धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सलग दुभाजक उभारून थेट प्रवेशाचा मार्ग बंद करण्यात आल्याने आपत्कालीन रुग्णवाहिकांना एक ते दोन




किलोमीटरचा वळसा घालावा लागत असल्याने रूग्णांच्या जिविताशी खेळ मांडला असुन बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे डोके ठिकाणावर आहे काय? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे यांनी केला.

आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेचा विचार न करता रस्त्याचे नियोजन करण्यात आले आहे का? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे डोके ठिकाणावर आहे काय? असा सवाल उपस्थित करत डॉ. ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील दुभाजकाजवळ निदर्शने करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदन देण्यात आले.

# उपोषण स्थगित

दीर्घ काळापासून बेमुदत उपोषणाला बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची गुरूवारी पहाटे राज्य सरकारच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन उपोषण मागे घेण्याची अधिकृत विनंती केली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री दादा भुसे, आमदार प्रसाद लाड यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाशी कडक आणि आक्रमक सुरात चर्चा करताना मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीवर, सरकारच्या नितीवर गंभीर सवाल उपस्थित केले. शिष्टमंडळासोबतच्या चर्चेदरम्यान जरांगे पाटील यांनी ठामपणे सांगितले की, शासनाने गॅझेटियरची अंमलबजावणी केवळ शब्दांत न सांगता तात्काळ जीआर काढून करावी. न्या. शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदीपैकी एकही नोंद कमी होणार नाही याचे लेखी आश्वासन आम्हाला हवे आहे. या ५८ लाख नोंदीचे वितरण करणे आणि त्यांना कायदेशीर वैधता देण्याबाबत खुद्द मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांसमोर येऊन शब्द द्यावा तसेच सातारा संस्थानचे गॅझेटियर लागू करण्यासाठी सरकारला ३ महिन्यांची मुदत देण्याची तयारी दर्शवताना जरांगे यांनी स्पष्ट केले की, या सर्व नोंदीवर मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी असावी आणि शासनाने आता मराठा समाजाची फसवणूक करणे थांबवावे. चर्चेदरम्यान जरांगे यांनी नुकत्याच काढण्यात आलेल्या शासकीय अध्यादेशांचा दाखला देत सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, ९ सप्टेंबर रोजी राज्य सरकारने वैश्य वाणी आणि हिंदू वाणी समाजासाठी जीआर काढून त्यांना आरक्षणाचा लाभ दिला. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठा समाज कुणबीच होता.नजरचुकीने तो आरक्षणापासून वंचित राहिला, असा उल्लेख जसा त्यांच्या जीआरमध्ये केला आहे तसाच जीआर मराठा समाजासाठी काढण्यास सरकारला काय अडचण आहे? इतर समाजासाठी एक न्याय आणि मराठा समाजासाठी वेगळा न्याय का? गिरीश महाजन यांच्या काळात कोणत्याही मोठ्या मागणीशिवाय ५६ जातींचा आरक्षणात समावेश करण्यात आला. १९०१ ची जनगणना आणि १८८४ च्या गॅझेटची नोंद असताना मराठवाडा आणि महाराष्ट्रातील मराठी समाजालाच आरक्षणापासून दूर का ठेवले जात आहे? मराठा समाजाच्या परिस्थितीवर बोलताना जरांगे म्हणाले, केवळ ५ टक्के मराठा श्रीमंत किंवा सत्तेत असले म्हणून संपूर्ण समाज श्रीमंत होत नाही. उर्वरित ९५ टक्के गरीब मराठ्यांच्या पोरांचे काय? स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्यातील संपूर्ण मराठा समाज आरक्षणात होता. आंदोलनापुरते आश्वासन देऊन पुन्हा त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रशासनाची सवय आता चालणार नाही. हैदराबाद गॅझेटनुसार, संख्येनुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन व्हॅलिडिटी द्यावीच लागेल. सरकारच्या भूमिकेवरच आंदोलनाची पुढील दिशा ठरणार असल्याचे जरांगे यांनी बजावले. बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे मनोज जरांगे यांनी आपले उपोषण ९० दिवसांसाठी स्थगित करण्याची अधिकृत घोषणा केली.

सरकारच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत सुमारे दीड तास चाललेल्या प्रदीर्घ आणि सरकारात्मक चर्चेनंतर जरांगे यांनी हा निर्णय घेतला. उपोषण सोडले तरी मराठा आरक्षणाचा लढा सुरूच राहील, असे स्पष्ट करत त्यांनी आधीच मुंबई गाठलेल्या सुमारे १ लाख समर्थकांना शांततेत माघारी फिरण्याचे आवाहन केले. शिष्टमंडळासमवेत चर्चेदरम्यान जरांगे म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे माझे वैरी नाहीत मात्र समोरून राजकीय वार झाले तर शांत बसणार नाही. आरक्षणापेक्षा मराठा समाजाचा सन्मान आणि इज्जत अधिक महत्त्वाची आहे. प्रशासनाने आता मराठा समाजाची फसवणूक न करता दिलेल्या ९० दिवसांच्या कालावधीत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्यात, असे त्यांनी बजावले. हिंदू वाणी, हिंदू वैश्य आणि वैश्य वाणी या तिन्ही जाती एकच असल्याचा सुधारित जीआर काढला जातो मग याच धर्तीवर 'मराठा आणि कुणबी एकच आहेत', असा जीआर सरकार का काढत नाही? असा सवाल जरांगे यांनी केला. आता ९० दिवसांत शासनाने मराठा समाजाला पुन्हा धोका दिला तर संपूर्ण मराठा समाज थेट मुंबई गाठून बेमुदत आंदोलन उभारेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# गांधींना देवही करू नका, खलनायकही करू नका!

आज ०२ ऑक्टोबर, मोहनदास करमचंद गांधी यांची जयंती. या जयंतीच्या निमित्ताने आज थोडासा वेगळा विचार आजच्या तरुणांसाठी. आजच्या तरुण भारतासमोरचा सर्वात मोठा प्रश्न केवळ बेरोजगारी, महागाई, तंत्रज्ञान किंवा राजकारणाचा नाही; तो विचार करण्याच्या स्वातंत्र्याचा आहे. आपण इतिहासाकडे डोळसपणे पाहणार आहोत की सोशल मीडियाने तयार केलेल्या तयार निष्कर्षांवर विश्वास ठेवणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. महापुरुषांच्या बाबतीत तर हा प्रश्न अधिक गंभीर होतो. एखाद्याला देव बनवायचे, त्याच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करायचे किंवा एखाद्याला खलनायक ठरवून त्याच्या संपूर्ण विचारविश्वालाच नाकारायचे. या दोन्ही टोकांच्या मध्ये असलेली चिकित्सक बुद्धी आज सर्वाधिक गरजेची आहे. म्हणूनच तरुणांनो, गांधींना देवही करू नका आणि खलनायकही करू नका!



महात्मा गांधी हे इतिहासाच्या काचेच्या पेटीत ठेवलेले निष्कलंक व्यक्तिमत्त्व नव्हते. ते आपल्या काळातील प्रचंड सामाजिक, राजकीय आणि नैतिक संघर्षांशी झुंजणारे माणूस होते. त्यांच्या विचारांशी सहमत होता येईल, असहमतही होता येईल; त्यांच्या निर्णयांची चिकित्सा करता येईल आणि त्यांच्या मर्यादांवर प्रश्नही उपस्थित करता येतील. पण प्रश्न विचारणे आणि पूर्वग्रहातून निकाल देणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. आजच्या तरुणाने हाच फरक समजून घेतला पाहिजे. महात्मा गांधींचे मूल्यमापन करताना फाळणी, खिलाफत चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी झालेले मतभेद, पूना करार, काँग्रेसमधील त्यांची भूमिका अशा अनेक प्रश्नांचा विचार केला जातो. या प्रत्येक विषयाला स्वतःचा ऐतिहासिक संदर्भ आहे. १९४७ ची फाळणी ही भारतीय उपखंडाच्या इतिहासातील अत्यंत भीषण शोकांतिका होती; विस्थापन, हिंसा आणि मानवी दुःखाने लाखो जीवनांना तडा गेला. पण या संपूर्ण गुंतागुंतीला एका व्यक्तीच्या माथी मारून इतिहास संपत नाही. गांधी हेरिटेज पोर्टलवरील नोंदीनुसार, काँग्रेस कार्यकारिणीने फाळणीचा प्रस्ताव स्वीकारला त्या काळात गांधी वैयक्तिकरीत्या फाळणीच्या विरोधात होते. त्यामुळे फाळणीच्या संपूर्ण जबाबदारीचे सरळ गणित गांधी = फाळणी असे मांडणे जितके इतिहासाचे सुलभीकरण आहे, तितकेच गांधींच्या प्रत्येक भूमिकेला प्रश्नातीत मानणेही इतिहासदृष्टीला अपुरे ठरते.

याच ठिकाणी तरुणांनी थांबून स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे,आपण इतिहास वाचतोय की इतिहासाच्या नावाने आपापल्या पूर्वग्रहांची जाहिरात करतोय? एखाद्या व्हिडिओतील तीस सेकंदांचा क्लिप, एखाद्या पोस्टमधील दोन ओळी किंवा एखाद्या राजकीय भाषणातील एखादा आरोप हा इतिहासाचा पर्याय होऊ शकत नाही. गांधींचे विचार समजून घ्यायचे असतील तर त्यांच्या मूळ लिखाणाकडे, समकालीन दस्तऐवजांकडे आणि विविध इतिहासकारांच्या अभ्यासाकडे पाहावे लागेल. गांधी हेरिटेज पोर्टलवर त्यांच्या 'कलेक्टड वर्क्स'चे शंभराहून अधिक खंड आणि त्यांच्या प्रमुख ग्रंथांचे दस्तऐवजीकरण उपलब्ध आहे.

आजच्या डिजिटल युगात आपण एका विचित्र सवयीचे गुलाम होत आहोतआपल्याला निष्कर्ष आधी हवा असतो आणि तथ्ये नंतर. आपल्याला आपला नायक निर्दोष हवा असतो आणि विरोधक पूर्णपणे दोषी. पण इतिहास असा काळा-पांढरा नसतो. इतिहासात माणसे असतात, त्यांच्या भूमिका असतात, त्यांच्या चुका असतात, त्यांची बदलती मते असतात आणि त्यांच्या निर्णयांमागे त्या काळाची गुंतागुंत असते. म्हणूनच गांधींची चिकित्सा करा; पण चिकित्सा म्हणजे निंदा नव्हे. गांधींच्या विचारांशी असहमती नोंदवा; पण असहमती म्हणजे इतिहासाचा अपमान नव्हे. आणि गांधींच्या योगदानाचे स्मरण करा; पण स्मरण म्हणजे अंधभक्ती नव्हे.

गांधींच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वावलंबन, अस्पृश्यतेविरोध, हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामान्य माणसाशी जोडलेले राजकारण हा होता. गांधी हेरिटेज पोर्टलही त्यांच्या कार्याशी सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वदेशी आणि समानतेच्या विचारांचा संबंध नोंदवते. या विचारांपैकी काही आजच्या तरुणांना पटतील, काही पटणार नाहीत. पण ते समजून घेण्याआधीच त्यांना नाकारणे म्हणजे स्वतःच्या बौद्धिक क्षमतेवरच संशय घेणे होय. गांधींच्या 'तावीजा'चा अर्थही इथेच महत्त्वाचा ठरतो. निर्णय घेताना समाजातील सर्वांत दुर्बल आणि शेवटच्या माणसाचा विचार करण्याची नैतिक कसोटी त्यांनी मांडली. आजच्या तरुणांनी हा विचार अक्षरशः स्वीकारावा की त्यावर प्रश्न उपस्थित करावेत, हा प्रत्येकाचा वैचारिक अधिकार आहे; पण आपल्या निर्णयाचा परिणाम समाजातील दुर्बल घटकांवर काय होतो, हा प्रश्न विचारण्याची सवय लोकशाहीला अधिक जबाबदार बनवू शकते.

आणि म्हणूनच तरुणांनो, गांधींच्या पुतळ्यांवर फुले वाहणे पुरेसे नाही; त्यांच्या विचारांशी वाद घालण्याची हिंमतही हवी. त्याचप्रमाणे गांधींच्या नावावर चिखलफेक करून स्वतःला इतिहासाचा अंतिम न्यायाधीश समजणेही धोकादायक आहे. महापुरुषांची खरी परीक्षा त्यांच्या पुतळ्यांसमोर उभे राहून होत नाही; त्यांच्या विचारांसमोर स्वतःला उभे करून होते.

आपल्याला गांधींची भक्ती नको, त्यांची चिकित्सा हवी. गांधींचा द्वेष नको, त्यांच्या विचारांशी संवाद हवा. त्यांच्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन नको आणि प्रत्येक निर्णयाचे दानवीकरणही नको. जे पटते ते स्वीकारण्याची, जे पटत नाही त्यावर प्रश्न विचारण्याची आणि जे चुकीचे वाटते त्यावर तर्काने आक्षेप घेण्याची बौद्धिक प्रामाणिकता हवी.कारण शेवटी प्रश्न गांधींचा नाही; प्रश्न आपल्या विचार करण्याच्या क्षमतेचा आहे. उद्या गांधी नसतील, आंबेडकर नसतील, फुले नसतील, शिवाजी महाराज नसतील, सावित्रीबाई नसतील; पण त्यांच्याकडे पाहण्याची आपली दृष्टी पुढच्या पिढीसमोर असेल. आपण तिला अंधभक्तीची परंपरा देणार की चिकित्सक विचारांची?

तरुणांनो, महापुरुषांकडून चमत्कार मागू नका. त्यांच्या विचारांना प्रश्न विचारा. त्यांचे योगदान समजून घ्या. त्यांच्या मर्यादाही तपासा. इतिहासाला राजकीय घोषणांचा गुलाम बनवू नका. कारण महापुरुषांना देव बनवले की विचार मरतात आणि खलनायक बनवले की इतिहास मरतो. महापुरुषांना माणूस म्हणून समजून घेतले की विचार जिवंत राहतात. आजची गरज एवढीच,गांधींना देवही करू नका, खलनायकही करू नका; त्यांना इतिहासाच्या कठोर प्रकाशात उभे करा आणि त्यांच्या विचारांची परीक्षा स्वतःच्या विवेकाने घ्या.

सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड
मराठी विभाग दूरभाष : ९५०३२८१९२८

पान १/४ वरून

## खासबाग देवी मंदिरात

व्यवस्था करण्यात आली आहे. यंदा शीतला मातेच्या नवीन मंदिराचीही निर्मिती करण्यात आली आहे. नवरात्र काळात सर्व देवीभक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

**बॅनरमुक्त परिसर**

नवरात्र महोत्सव काळात मंदिर परिसरात राजकीय तसेच जाहिरातींचे बॅनर लावले जाणार नाहीत. त्यामुळे भाविकांना स्वच्छ आणि धार्मिक वातावरणात देवीचे दर्शन घेता येणार आहे.

**दररोज धार्मिक कार्यक्रम**

पहाटे साडेपाच वाजता आरती, सायंकाळी सात वाजता पालखी छबिना मिरवणूक आणि रात्री आठ वाजता सामूहिक महाआरती होणार आहे. घटस्थापनेच्या दिवशी सकाळी सहा वाजता महाभिषेक होईल.

## गाव स्वच्छतेसाठी ग्रामस्थ

होत ग्रामस्थांना स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. आगामी काळात नांदडी गावासाठी एक हजार वृक्षांची रोपे उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमात सातत्याने सहभागी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत अधिकारी सुनील शिवाजीराव मामाडगे व गटनेते आबासाहेब देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागामुळे नांदडी येथे स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

## आदित्य कृषी महाविद्यालयात

आला. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर परिसरात विविध रोपांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या रोपांच्या संवर्धनाची प्रतिज्ञा घेतली. कृषी कार्यानुभवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सेंद्रिय व आधुनिक शेतीची माहिती पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, एनएसएस कार्यक्रम अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. ज्ञानातून समाजसेवा आणि सेवेतून व्यक्तिमत्त्व विकास या उद्देशाला या उपक्रमातून उजाळा मिळाला.

## जीवनात ज्ञानेश्वरी सर्व सुख

महोत्सवात श्रीराम कथा, भजन, भारुडांसह ख्यातनाम कीर्तनकारांच्या कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दररोज सकाळी ७ ते १० या दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे नेतृत्व ह.भ.प. नामदेव महाराज शेकटेकर (माऊली संस्थान), ह.भ.प. राम महाराज अंबुले (पाडुळ्याचीवाडी) यांच्याकडे आहे. तर भाव धरुनियां वाची ज्ञानेश्वरी। कृपा करी हरी तयावरी या ओवी प्रमाणे भव्य कीर्तन महोत्सवात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आलेले असून पारायण करण्यासाठी भाविक भक्तांनी उदय पाठक ९४२२०४१९०७ यांच्या दुरध्वनीवर नोंदणी करुन या अभूतपूर्व आध्यात्मिक आनंदात सामील होवून ज्ञानेश्वरी पारायणात जास्तीत जास्त भाविक-भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवाजीराव दादा पंडित अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्व. नारायणराव मोटे सरांचे

आर्दड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, नारायणराव मोटे हे अजातशत्रू व सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व होते. सर्वांशी आपुलकीचे व जिव्हाळ्याचे संबंध त्यांनी जपले. शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक निवड समितीचे ते तब्बल १९ वर्षे अध्यक्ष होते. अत्यंत पारदर्शकपणे काम करत त्यांनी गेवराई तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी योग्य निवड केली.

प्रवीणकुमार काळम पाटील म्हणाले की, मोटे सरांनी एक व्यक्ती म्हणून कुटुंब जपले, शिक्षक म्हणून विद्यार्थी घडवले, नातेसंबंध जपले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणूस म्हणून माणूस व माणुसकी जपली. त्यांच्या कार्याचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा.

गटशिक्षणाधिकारी मयुर मोदानी यांनी मोटे सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना कंपास पेट्यांचे वाटप करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असून, या माध्यमातून मोटे सरांचे कार्य तिसऱ्या पिढीपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले.कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा कदम यांनी सांगितले की, गेवराई येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या पायाभरणीत

पान १/४ वरून

मोटे सरांचे मोठे योगदान आहे. शाळेसाठी जागा उपलब्ध करून देण्याबरोबरच मुलींच्या पालकांचा निवासी विद्यालयाबाबत विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्ता आर्दड (मोटे) यांनी केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा कदम यांनी आभार मानले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोटे परिवाराच्या या उपक्रमातून स्व. नारायणराव मोटे यांच्या शैक्षणिक, सामाजिक व माणुसकीच्या कार्याची स्मृती विद्यार्थ्यांच्या मनात जपली जात असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम ठरला.

## सेंट झेवियर्सच्या विद्यार्थ्यांचे

सुरवसे याने तृतीय क्रमांक मिळवून आपली चुणूक दाखवली. तसेच मुलींच्या गटात प्रीत अजित यादव हिने द्वितीय क्रमांक तर दुर्गा रामनाथ शेळके हिने तृतीय क्रमांक पटकावत यशाची परंपरा कायम ठेवली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे क्रीडा अधिकारी राठोड सर , सायकल असोसिएशन चे सचिव रामदास गिरी सर विशाल गिरी सर व शाळेच्या वतीने शाळेचे प्राचार्य जेम्स थोरात , मारिया डीवीज, अमोल कपूर, क्रीडा शिक्षक सुधीर हजारे तसेच शिक्षिका लिजमा जोसेफ, चंदा साबळे, सुषमा सरदे, नीलिमा ताकसांडे ,निर्मला पोपळे, ट्रेझा फ्रान्सिस, प्रीती हनवते, प्रीती करवंदे ,संध्या वाघमारे, सरस्वती चव्हाण , दिपाली चौरे त्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा रुग्णालयासमोरील

रुग्णवाहिकांना अतिरिक्त वळसा; गंभीर रुग्णांच्या जीवाला धोका

यापूर्वी बार्शी रोड तसेच राष्ट्रीय महामार्गावरून येणाऱ्या रुग्णवाहिकांना थेट वळसा घेऊन जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात दाखल होता येत होते. मात्र, दुभाजक उभारल्यानंतर हा थेट मार्ग बंद झाला आहे. परिणामी, रुग्णवाहिकांना पर्यायी मार्गाने एक ते दोन किलोमीटरचा अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे.

विशेषतः वाहतूक कोंडीच्या काळात या अतिरिक्त वळशामुळे रुग्णालयात पोहोचण्यास आणखी विलंब होण्याची शक्यता आहे. हृदयविकाराचा झटका, गंभीर अपघात, विषप्राशन अथवा अन्य जीवघेण्या परिस्थितीत पाच-दहा मिनिटांचा विलंबदेखील उपचार प्रक्रियेसाठी महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळे जिल्हा रुग्णालयासमोरील दुभाजकात तातडीने आपत्कालीन रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र मार्गिका अथवा पूर्वीप्रमाणे थेट प्रवेशाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

'वाहतूक नियोजन करताना रुग्णालयाचा विचार का नाही?'

राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी दुभाजक उभारणे आवश्यक असल्यास त्यासोबत जिल्हा रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवेच्या ठिकाणी आपत्कालीन प्रवेशमार्गाची व्यवस्था करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. रस्ता बंद करण्यापूर्वी स्थानिक वाहतूक व्यवस्था, रुग्णवाहिकांची हालचाल आणि आपत्कालीन आरोग्यसेवेची गरज यांचा अभ्यास करण्यात आला होता का, असा प्रश्न डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला.

जिल्हा रुग्णालयासमोरील दुभाजकात तातडीने रुग्णवाहिकांसाठी मार्ग खुला करावा, अन्यथा प्रशासनाच्या निष्काळजी नियोजनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, इंटक बीडचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, राष्ट्रीय किसान मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष भीमराव कुटे, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय तांदळे, नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच)प्राचार्य डॉ. डी. जी. तांदळे ( मार्गदर्शक बीड शहर बचाव मंच), अँड . सुरेंद्र देशमुख, दत्तात्रय सौंदरमल,पांडुरंग हराळे,आदी सहभागी झाले.

## गेवराईत भव्य शोभायात्रेने होणार

हजेरी लावणार आहेत. तर विदर्भरत्न ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीराम कथा ऐकण्याचा योग गेवराईकरांना येणार आहे. कार्यक्रमाची पूर्वतयारी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी करत आहेत. भाविक भक्तांनी श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व किर्तन महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरी पारायणाचे नेतृत्व ह.भ.प. नामदेव महाराज शेकटेकर व ह.भ.प. राम महाराज अंबुले करणार आहेत.

शनिवार, दि.३ ऑक्टोबर रोजी संगीत अलंकार ह.भ.प. गणेश महाराज जरांगे यांचा अभंगवाणी कार्यक्रम तर ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील, बुलढाणा यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. रविवार, दि.४ ऑक्टोबर रोजी भजन सम्राट डॉ.तुळशीराम आतकरे गुरुजी यांचे संगीत भजन तर ह.भ.प. युवकवीर ज्ञानेश्वर महाराज पठाडे, कर्जत यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. सोमवार, दि.५ ऑक्टोबर रोजी भारुड सम्राट ह.भ.प. विष्णू महाराज बांडे यांचे सोंगी भारुड आणि ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत, श्री मंगलगड, डोंबीवली यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. मंगळवार, दि.६ ऑक्टोबर रोजी भजन सम्राट आदिनाथ सटले गुरुजी यांचे संगीत भजन आणि ह.भ.प. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले, श्री क्षेत्र पंढरपूर यांचे किर्तन होणार आहे. बुधवार, दि.७ ऑक्टोबर रोजी पद्मश्री राशिद खाँ यांचे शिष्य

पान १/४ वरून

पंडित कृष्णाजी बोंगाणे यांचा अभंगवाणी कार्यक्रम आणि सुप्रसिध्द समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे किर्तन होणार आहे. गुरुवार, दि.८ ऑक्टोबर रोजी संगीत अलंकार सदानंद मगर व वैष्णवी मगर यांचे संगीत भजन आणि ह.भ.प. अधिवक्ता कृष्ण महाराज चवरे, श्री क्षेत्र पंढरपूर यांचे किर्तन होणार आहे. शुक्रवार, दि.९ ऑक्टोबर रोजी संगीत अलंकार उध्दव महाराज शिंदे यांचे संगीत भजन आणि संत तुकाराम महाराज यांचे अकरावे वंशज ह.भ.प. श्रीगुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे किर्तन होणार आहे. शनिवार, दि.१० ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे महंत ह.भ.प. प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. यावेळी सर्व धर्मीय संत-महंत यांच्या उपस्थितीत माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ, भजन संध्या व किर्तन महोत्सवाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## साहिल वाकोडे यांना

सायन्स व इंजिनिअरिंगला शिक्षण घेत होता. त्यांनी जाती आधारित भेदभाव व छळाला कंटाळून दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी वसतिगृहाच्या खोलीत आत्महत्या केली होती. या प्रकरणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. ना. रामदासजी आठवले यांनी मुंबई पवई येथील आयआयटी सेंटरला भेट देऊन साहिल वाकोडे यांच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती.

साहिल वाकोडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी रिपाइं आपल्या सोबत खंबीरपणे उभी असून साहिलला न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही. असे आश्वासन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आजाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषणास बसलेल्या साहिल वाकोडे यांच्या कुटुंबीयांना रिपाइंच्या वतीने दिले.

## गेवराई तालुक्यात तरुण

अडचणी आणि आर्थिक परिस्थिती यामुळेही ते तणावाखाली होते, अशी माहिती परिसरातून समोर येत आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाला वारंवार नापिकीचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या होत्या.

मंगळवारी सायंकाळी त्यांनी विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचार केले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या घटनेमुळे वडगाव (सुशी) परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या सततच्या नापिकीसह आर्थिक अडचणींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## पाच लाख रुपयाचा धनादेश

उसने दिली त्यावेळी आरोपी हा फिर्यादीस म्हणाला की, ज्यावेळेस आपणाला गरज आवश्यकता भासेल त्यावेळी ती रक्कम मिळून जाईल त्यानंतर फिर्यादीने ऑक्टोबर २०२१ मध्ये मध्ये एका प्लॉटच्या खरेदी संदर्भात सदर रकमेची आवश्यकता भासली त्यामुळे फिर्यादीने दिनांक ०४/१०/२०२१ रोजी आरोपीच्या घरी येऊन सदर रकमेची मागणी केली असता आरोपीने फिर्यादीस आरोपीचे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा नेकनूर ता जी बीड येथील खाते क्रमांक ६२२०५९६६०८३ या खात्याचा रक्कम रुपये पाच लक्ष रुपये धनादेश क्रमांक ८७६५८८ दिनांक ०४/१०/२०२१ रोजीचा फिर्यादीस दिला व सदर धनादेश वटवण्यास जमा केला असता सदर रक्कम मिळून जाईल अशी खात्री आरोपीने फिर्यादीस दिली त्यानंतर फिर्यादीने सदर धनादेश दिनांक ०४/१०/२०२१ रोजी त्याचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बँक शाखा जालना रोड येथील खात्यामध्ये वटवण्यास टाकला असता सदर धनादेश धनादेश वटण्याइतपत रक्कम आरोपीच्या खात्यावर उपलब्ध नाही या कारणाने दिनांक ०५/१०/२०२१ रोजी फिर्यादीस परत मिळाला त्यानंतर फिर्यादीने आरोपीशी संपर्क साधला परंतु आरोपीने फिर्यादीस उडवा उडवीचे उत्तरे दिले सदर धनादेशावरील रक्कम आरपीने फिर्यादीस देण्यास साफ नकार दिला. त्यानंतर फिर्यादीची खात्री झाली की आरोपीने सदर धनादेश रक्कम आरोपीच्या खात्यात उपलब्ध रक्कम नसतानाही फसवण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक सदर धनादेश फिर्यादीस दिला. त्यानंतर फिर्यादीने ॲड. सागर नाईकवाडे यांच्या मार्फतीने दिनांक ०६/१०/२०२१ रोजी धनादेश रक्कम मागणीची नोटीस आरोपीस पाठवली सदर नोटीस आरोपीस दिनांक ०७/१०/२०२१ रोजी मिळाली नोटीस मिळून देखील आरोपीने धनादेश रक्कम फिर्यादीस आणून दिली नाही म्हणून फिर्यादीने ॲड. सागर नाईकवाडे यांच्यामार्फत माननीय मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयात संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १२७१/२०२१ दाखल केला सदर प्रकरण दाखल केल्यानंतर फिर्यादीतर्फे फिर्यादीची साक्ष नोंदवण्यात आली त्यानंतर आरोपीने स्वतःची साक्ष व अजून एक साक्षदाची साक्ष बचाव कामी नोंदवली सदर प्रकरणात दाखल केलेल्या संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन करून व फिर्यादी यांच्या विधीज्ञाचा व आरोपीच्या विधीज्ञाचा युक्तिवाद ऐकून माननीय न्यायालयाने आरोपीस सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली व धनादेश रक्कम ही धनादेश न वटलेल्या तारखेपासून नऊ टक्के वार्षिक व्याजदराने फिर्यादीत देण्याचे आदेशित केले

सदर प्रकरणात फिर्यादी तर्फे ॲड. सागर नाईकवाडे, यांनी काम पाहिले त्यांना ॲड. सुधीर जाधव, ॲड. सतीष गाडे, ॲड.राजेश जाधव, ॲड. विवेक डोके ॲड. कृष्णा आवारे, ॲड. आकाश गायकवाड यांनी सहकार्य केले.

# भारतीय रग्बी संघात निवड झालेल्या बीडच्या कन्यांचा शांताई अर्बनकडून दिमाखदार सन्मान

## क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

बीड, दि. ३० सप्टेंबर २०२६ : शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., बीड यांच्या वतीने भारतीय रग्बी संघात निवड झालेल्या बीडच्या तीन गुणवंत कन्यांचा दिमाखदार सत्कार करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या सत्कार सोहळ्यात कु. दिपाली दिलीप ताठे, कु. अदिती सखाराम लोंढे आणि कु. किर्ती किरण जाधव या सत्कारमूर्तींच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. त्यांच्या मेहनतीला, जिद्दीला आणि सातत्यपूर्ण सरावाला दाद देत मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या तीनही कन्यांनी भारतीय रग्बी संघात स्थान मिळवून बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशामागे मोरया क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व प्रशिक्षक श्री. नितीन येळवे सर, प्रशिक्षक श्री. शोपेब खाटीक सर, सचिव श्री. अशोक चौरे सर तसेच प्रशिक्षक श्री. साईनाथ राजे सर यांचे विशेष परिश्रम व मार्गदर्शन लाभले आहे. खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमास मा. श्री. सिद्धेश्वर सांगुळे, सहकार अधिकारी, उपनिबंधक कार्यालय, बीड, उपाध्यक्ष श्री. संदीप वाघमारे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ॲड. पांडव सर, ऑडिटर कुंडलकर सर, श्री. महेश साबळे सर, श्री. स्वप्नील शेळके, पी. जी. पोळ सर, श्री. रामेश्वर राऊत सर, काटे मामा, बँक व्यवस्थापक सौ. आरती कुलकर्णी तसेच श्री. महादेव नरवडे सर यांची उपस्थिती होती.



यावेळी मनोगत व्यक्त करताना मा. श्री. सिद्धेश्वर सांगुळे यांनी सांगितले की, बीडच्या या तीन कन्यांनी भारतीय रग्बी संघात स्थान मिळवून संपूर्ण जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंमध्येही मोठी क्षमता असून, योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या जोरावर ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतात. या खेळाडूंच्या यशातून बीडमधील अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल. गुणवंत खेळाडूंच्या पाठीशी समाजातील विविध संस्था आणि नागरिकांनी उभे राहणे गरजेचे आहे. शांताई अर्बनने या गुणवंत खेळाडूंचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

यानंतर शांताई अर्बनचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, बीडच्या या तीन कन्यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर भारतीय रग्बी संघात स्थान मिळवून संपूर्ण बीड जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. गुणवंत आणि होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून, त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचा एक प्रयत्न आहे. शांताई अर्बन ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून, सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, क्रीडा, संस्कार आणि समाजहिताच्या उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देणारी संस्था आहे. समाजातील गुणवंतांचा सन्मान आणि त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे ही शांताई अर्बनची सातत्यपूर्ण भूमिका राहिली आहे. या तीनही खेळाडूंच्या यशाचा सन्मान करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. त्यांनी भविष्यात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी मोठे यश संपादन करून बीडचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

शांताई अर्बनच्या या उपक्रमातून क्रीडा क्षेत्रातील गुणवंतांना प्रोत्साहन देण्याची संस्थेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली. बीडच्या या तीनही कन्यांचे यश युवा खेळाडूंसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी पी. जी. पोळ सर यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविणाऱ्या सर्व मान्यवरांचे, सत्कारमूर्तींचे, प्रशिक्षकांचे तसेच शांताई अर्बनच्या पदाधिकारी व कर्मचारीवर्गाचे मनःपूर्वक आभार मानले.

# स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेला देहव्यापार उघडकीस

## दोन महिलांची सुटका, एकावर गुन्हा दाखल; अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई

बीड । प्रतिनिधी

शहरात स्पा सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या बेकायदेशीर व्यवसायांवर बीड पोलिसांनी मोठी धडक कारवाई केली आहे. नगर नाका परिसरातील एका नामांकित स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश करत पोलिसांनी दोन महिलांची सुटका केली, तर चालकास अटक केली आहे. याशिवाय, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अन्य दोन स्पा सेंटर्सवरही छापे टाकून १० जणांवर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या कारवाईमुळे शहरातील अनैतिक व्यवसाय चालवणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

बनावट ग्राहक पाठवून टाकला छापा

पोलीस ठाणे शिवाजी नगर हद्दीतील नगर नाका परिसरामध्ये असलेल्या ‘मिडौज स्पा’ येथे स्पाच्या नावाखाली बाहेरून महिला आणून देहव्यापार चालविला जात असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या () सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना मिळाली होती.





माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या आदेशानुसार ३० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास बनावट ग्राहक (डमी ग्राहक) व पंचांच्या मदतीने सापळा रचण्यात आला. खात्री होताच पोलिसांनी अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान दोन महिलांची सुटका करण्यात आली, तर स्पा चालक आरोपी सोमदेव राजेंद्र भारती (वय २४ वर्षे, रा. अणदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यास ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळावरून रोख रक्कम व आक्षेपार्ह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा () व ’बीएनएस’ कायद्यान्वये गुन्हा (गु.र.नं. ३१६/२६) दाखल करण्यात आला आहे.

इतर दोन स्पा सेंटरवरही तपासणी मोहीम; १० जणांवर कारवाई

दरम्यान, शहर हद्दीत गस्त घालत असताना पथकाने जालना रोडवरील नवगन प्लाझामधील ‘क्रिस्टल स्पा सेंटर’ आणि बार्शी रोडवरील काझी संघाय कॉम्प्लेक्समधील ‘ब्लिस स्पा अँड वेलनेस’ येथे तपासणी केली. या दोन्ही ठिकाणी नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निष्पन्न झाल्याने, दोन्ही ठिकाणच्या मिळून एकूण १० जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस पथकाची कामगिरी

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, पोलीस उपअधीक्षक राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सपोनि जनाबाई सांगळे, महिला पोलीस अंमलदार मिरा रेडेकर, उषा चौरे, शोभा जाधव, सविता चव्हाण तसेच अंमलदार अशोक शिंदे, भाऊसाहेब कारले व संदीप गर्जे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# कुमसी सज्जा येथे ग्राम महसूल अधिकारी स्वाती घुगे यांना भावपूर्ण निरोप; शीलाताई काळे यांचे स्वागत



बीड । प्रतिनिधी

कुमसी सज्जा, ता. जि. बीड : कुमसी सज्जा येथील ग्राम महसूल अधिकारी श्रीमती स्वाती घुगे यांची प्रशासकीय बदली झाल्यानंतर त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. तसेच कुमसी सज्जा येथे नव्याने नियुक्त झालेल्या ग्राम महसूल अधिकारी श्रीमती शीलाताई काळे यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी श्री गायके राजू, जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना बीड , श्री नारायण करपे, श्री श्रीकृष्ण गायके, श्री जयराम करपे, प्रभाकर माने, प्रल्हाद माने यांच्या वतीने श्रीमती स्वाती घुगे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नवनियुक्त ग्राम महसूल अधिकारी श्रीमती शीलाताई काळे यांचेही स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री गायके राजू म्हणाले की, “ कुमसी सज्जा येथे गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात श्रीमती स्वाती घुगे यांनी सौंदाना, कुमसी आणि पिंपळगव्हाण या गावांतील शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांकडे अत्यंत जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने पाहिले. आपल्या पदाचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी करून त्यांनी केलेले काम निश्चितच उल्लेखनीय आहे.”

श्रीमती स्वाती घुगे यांच्या बदलीची बातमी समजल्यानंतर सौंदाना, कुमसी आणि पिंपळगव्हाण या तिन्ही गावांतील शेतकरी व नागरिकांच्या डोळ्यांत दुःखाश्रू आले. कारण त्यांच्या कार्यकाळात जनतेशी असलेला आपुलकीचा संवाद आणि प्रशासकीय कामकाजातील पारदर्शकता यामुळे त्यांनी सर्वांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले होते. गायके राजू पुढे म्हणाले की, “ श्रीमती स्वाती घुगे यांच्या कार्याचा आढावा घेतला तर आठ-दहा दिवसही कमी पडतील त्यांचे गुणगान सांगण्यासाठी. त्यांनी खूपच असे अत्यंत सुंदर, आशादायी आणि जनतेला समाधान देणारे काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय कामासाठी आलेल्या कोणत्याही नागरिकाला विनाकारण त्रास होऊ नये, याची त्यांनी नेहमी काळजी घेतली. प्रशासकीय पदावर काम कसे करावे, याचा आदर्श त्यांनी कुमसी सज्जातील शेतकरी व नागरिकांसमोर निर्माण केला आहे.”

नवनियुक्त ग्राम महसूल अधिकारी श्रीमती शीलाताई काळे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, “ श्रीमती स्वाती घुगे यांनी ज्या पद्धतीने काम केले, त्याच पावलावर पाऊल ठेवून काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. माझ्यामुळे कोणालाही त्रास होणार नाही. कुमसी सज्जातील सर्व नागरिक आणि शेतकरी यांच्या अपेक्षेप्रमाणे पारदर्शक व जबाबदारीने काम करून देण्याची मी ग्वाही देते.” यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्रीमती स्वाती घुगे यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच श्रीमती शीलाताई काळे यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत कुमसी सज्जातील जनतेच्या सेवेसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथील वर्तमान पत्रांची रद्दी आहे. त्यास्थितीत व स्वरूपात रद्दीची विक्री करावयाची आहे. ज्यांना रद्दी घ्यावयाची आहे. त्यांना कार्यालयीन वेळेत रद्दी पाहवयास मिळेल.

तसेच रद्दी खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या लिफाफाबंद निविदा दरपत्रक प्रति किलोप्रमाणे जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजुला, नगर रोड, बीड या पत्यावर दि.०७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, रद्दी विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड यांचे असतील. ०७ ऑक्टोबर २०२६ तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

# बीड येथे निवृत्तवेतनधारकांसाठी ६ ऑक्टोबरला महा-उपलब्धी ॲप विषयक मार्गदर्शन कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सेवानिवृत्तवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तवेतनधारकांसाठी राज्य शासनाच्या वित्त विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सेवानिवृत्तीवेतनाविषयक सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी दि. १ जुलै २०२६ पासून महा-उपलब्धी हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्तवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तवेतनधारकांनी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील सामाजिक न्याय भवनातील कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

या डिजिटल सुविधेमुळे आता निवृत्तवेतनधारकांना हयातनामा सादर करणे किंवा आयकर विषयक फॉर्म १६ मिळवणे अशा कामांसाठी वारंवार कोषागार कार्यालयात फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासणार नाही. या नव्याने सुरू झालेल्या मोबाईल ॲपबाबत सेवानिवृत्तवेतनधारकांमध्ये व्यापक जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व कोषागार कार्यालयांच्या वतीने एकाच दिवशी आभासी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

वित्त विभागाचे प्रधान सचिव यांच्या निर्देशानुसार बीड येथील जिल्हा सामाजिक न्याय भवनात मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला स्वतः प्रधान सचिव हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहून सेवानिवृत्तवेतनधारकांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. वित्त विभागाने विकसित केलेले हे महा-उपलब्धी ॲप अँड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही प्रणाली असणाऱ्या मोबाईल फोनवर उपलब्ध आहे. या ॲपच्या वापरामुळे ज्येष्ठ नागरिकांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचणार आहेत. या कार्यशाळेमुळे महा-उपलब्धी ॲप हाताळताना येणाऱ्या अडचणी व शंकांचे जागेवरच निरसन करणे सुलभ होण्यास मदत होणार आहे. असेही कळविले आहे.

# दुष्काळात चारा-पाण्याला प्रथम प्राधान्य; गावनिहाय सूक्ष्म नियोजनाचे विभागीय आयुक्तांचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीत चारा आणि पाणी यांना प्रथम प्राधान्य द्या, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी दुष्काळ, खरीप हंगाम आणि महसूल विभागाच्या उपक्रमांचा आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, परिविक्षाधीन सहायक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, सर्व विभागप्रमुख, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

पुढील दहा महिन्यांचे नियोजन

प्रत्येक गाव आणि तांड्याचे सूक्ष्म नियोजन करावे, असे आयुक्तांनी सांगितले. तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांनी प्रत्येक गावाची प्रत्यक्ष पाहणी करावी. पुढील दहा महिन्यांच्या पाणी व चाऱ्याचे नियोजन करावे. टँकरवर अवलंबून न राहता दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात. टँकरच्या खर्चात तात्पुरती पाइपलाइन देऊन पाणी देता येत असेल, तर तो पर्याय तपासावा. आवश्यक ठिकाणी टँकर फिलिंग पॉइंट उभारावेत. पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी वापरावे, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. दुष्काळात प्रत्येक गावात रोजगार हमी योजनेची कामे सुरू असावीत, प्रत्येक गरजूला काम मिळावे आणि त्याचा मोबदलाही वेळेत मिळावा, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. गरिबीपोटी अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी जिल्ह्यात सामूहिक विवाह मेळावे आयोजित करण्याचे निर्देशही देण्यात आले.

जिल्ह्यातील दुष्काळाची स्थिती

३० सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात सरासरी ५६६.१ मिमी पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात ३५६.६ मिमी (सुमारे ६३ टक्के) पाऊस झाला. केज तालुक्यात सर्वाधिक ९३.४ टक्के, तर गेवराईत सर्वात कमी ४२.५ टक्के पाऊस नोंदला गेला.



भूजल :निरीक्षण विहिरींतील सरासरी पाणीपातळी ७.३६ मीटरवर गेली आहे. ती मागील पाच वर्षांच्या सप्टेंबर सरासरीपेक्षा (२.८१ मीटर) ४.५५ मीटरने खोल आहे. तपासलेल्या सर्व १२६ विहिरींत घट आहे. गेवराईत ६.६४ मीटरची सर्वाधिक घट आहे.

धरणे : १६४ प्रकल्पांमध्ये केवळ १६.३८ टक्के उपयुक्त साठा आहे. माजलगाव प्रकल्पात २८.५३ टक्के, मध्यम प्रकल्पांत १२.४९ टक्के आणि लघु प्रकल्पांत ५.४९ टक्के साठा आहे. ३२ प्रकल्प कोरडे आहेत.

टँकर : २९ सप्टेंबरअखेर ६३ गावे आणि ७१ वाड्यांतील सुमारे २.११ लाख लोकसंख्येला १४३ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. २८ गावे व ३२ ठिकाणी विहीर/बोअर अधिग्रहण करण्यात आले आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ साठीचा टंचाई कृती आराखडा तयार केला जात असून तो शासनाला सादर केला जाईल.

चारा : उपलब्ध चारा सरासरी सुमारे ३७ दिवस पुरेल. पाटोदा (२१ दिवस) आणि आष्टी (२७ दिवस) येथे परिस्थिती अधिक बिकट आहे. परळीत हा साठा सर्वाधिक, म्हणजे ७० दिवस पुरेल एवढा आहे. *

खरीप पेरणी व पीक नुकसान

खरीप हंगामात ८,०८,९४६ हेक्टर अपेक्षित क्षेत्रापैकी ७,८७,२१८ हेक्टरवर (९७.३१ टक्के) पेरणी झाली. सोयाबीनची पेरणी १३७.९० टक्के, तर कापसाची ७८.३६ टक्के झाली. प्राथमिक पाहणीत जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान आढळले असून, बाधित क्षेत्र सुमारे ५.१४ लाख हेक्टर असल्याचा अंदाज आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत (पाणलोट विकास) आष्टी, बीड व गेवराई येथील तीन प्रकल्पांसाठी २,३४१.३३ लाख रुपये मंजूर आहेत. यातून १०,६४२ हेक्टर क्षेत्र उपचारित होणार आहे.

कार्यालयीन स्वच्छता व शिस्त

कार्यालयांत स्वच्छता राखणे बंधनकारक असून, दर सोमवारी सकाळी एक तास स्वच्छता करावी लागेल. ९ ऑक्टोबरनंतर कार्यालय किंवा शौचालयांत अस्वच्छता आढळल्यास कार्यालयप्रमुख व संबंधित अधिकाऱ्यांना १,००० रुपयांपर्यंत दंड होईल. शौचालये अस्वच्छ आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या केबिनमधील शौचालये सील केली जातील. महात्मा गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष स्वच्छता मोहीम घेतली जाणार आहे.

**सेवा संकल्प अभियान**

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबवले जात आहे. त्यात फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा, स्वामित्व सनद, शिधापत्रिका, विविध प्रमाणपत्रे अशा २२ सेवा दिल्या जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरे ६ ते १५ ऑक्टोबरदरम्यान सर्व तालुक्यांत होतील. ‘राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता’ अभियानात विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना योजनांचा लाभ व प्रमाणपत्रे दिली जात आहेत. बीड तालुक्यात १ ऑक्टोबरच्या शिबिरात ६८ लाभार्थ्यांना विविध लाभ मिळाले.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande (E-mail-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे

सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
शुक्रवार दि. ०२ ऑक्टोबर २०२६





# मतदार यादी पुनरीक्षण 'वगळण्याची' नव्हे, 'समाविष्ट करण्याची' प्रक्रिया; पदवीधर निवडणुकीची तयारी जोरात-विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण ही मतदारांना वगळण्याची प्रक्रिया नसून, पात्र मतदारांना यादीत समाविष्ट करून घेणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे, असे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी कार्यक्रम आणि औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.

: आतापर्यंतची स्थिती

जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदारसंघांत २१.९३ लाख मतदारांना गणना अर्ज वाटण्यात आले. २४ ऑगस्टच्या अहवालानुसार १९.५३ लाख (८९.०४ टक्के) अर्जांचे डिजिटायझेशन झाले. उर्वरित २,४०,४७७ मतदार (१०.९६ टक्के) 'संकलित न होणारे' आहेत. त्यात मृत ५०,९१३, पत्त्यावर न सापडणारे/गैरहजर ५६,८८६, कायमस्वरूपी स्थलांतरित १,०३,३३४, इतर ८२८ आणि इतरत्र नोंदणी झालेले २८,५१६ मतदार आहेत. बीड मतदारसंघात हे प्रमाण सर्वाधिक १९.५१ टक्के आहे. त्यापाठोपाठ परळी १२.३०, केज ११.०५ आणि माजलगाव ९.५३ टक्के आहे. आष्टीत सर्वात कमी, ६.३८ टक्के आहे. मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणानंतर केंद्रांची संख्या २,४१६ वरून २,३९३ झाली. १,३००



पेक्षा जास्त मतदार असलेल्या १५ ठिकाणी नवी केंद्रे, तर २२ केंद्रांचे स्थान बदलण्यात आले आहे. जिल्ह्यात राजकीय पक्षांचे ८,१०१ बूथ लेव्हल एजंट () नियुक्त झाले आहेत. सध्या नोटीस व सुनावणीचा टप्पा सुरू आहे. एकूण १,५२,१७९ नोटिसांपैकी १,०५,९७८ बजावण्यात आल्या असून ४६,१८८ बजावणे बाकी आहे. आतापर्यंत ९,३६५ सुनावण्या पूर्ण झाल्या आहेत.

पुढील टप्पे

- दावे व हरकती दाखल करण्याची मुदत : १२ ऑक्टोबर - नोटीस व दावे-हरकती निकाली काढणे : १० नोव्हेंबरपर्यंत - अंतिम मतदार यादी प्रसिद्धी : १६ नोव्हेंबर

पदवीधर मतदारसंघ निवडणूक

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबरला निघाली. नामनिर्देशनाची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, छाननी ७ ऑक्टोबर आणि माघार ९ ऑक्टोबर आहे. मतदान २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होईल, तर मतमोजणी २७ ऑक्टोबरला होईल. निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करायची आहे. बीड जिल्ह्यात १२ जानेवारीच्या यादीनुसार ५४,२०६ पदवीधर मतदार आहेत (४२,२८२ पुरुष, ११,९२२ महिला, २ इतर). त्यात सर्वाधिक १४,०६२ मतदार बीड तालुक्यात आहेत. नवीन नोंदणीसाठी ४,२६१ अर्ज आले असून २,६३० मंजूर, १,५७३ प्रक्रियेत आणि ५८ नामंजूर आहेत. पडताळणीत १,१२२ मतदार वगळण्यात आले आहेत. जिल्ह्यात १२७ मतदान केंद्रे प्रस्तावित आहेत, त्यातील सर्वाधिक ३२ बीड तालुक्यात आहेत.

आचारसंहिता

आचारसंहितेच्या पहिल्या ७२ तासांत शासकीय, सार्वजनिक व खासगी मालमत्तेवरील मिळून सुमारे ४,८७४ विद्रूपीकरणाच्या प्रकरणांची नोंद झाली. त्यापैकी ४,६८५ ठिकाणी ते काढण्यात आले आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती, खर्च नियंत्रण, अवैध दारू प्रतिबंध अशा विविध कक्षांवर नोडल अधिकारी नेमण्यात आले आहेत.

# खासबाग देवी मंदिरात बॅनरमुक्त नवरात्रोत्सव

## धार्मिक कार्यक्रमांसह आकर्षक रोषणाई; घटस्थापनेचा महाभिषेक सकाळी सहा वाजता

बीड । प्रतिनिधी

बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिरात यंदाचा नवरात्र महोत्सव राजकीय व जाहिरातींच्या बॅनरपासून मुक्त ठेवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. नवरात्र महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी विश्वस्त मंडळाची बैठक अध्यक्ष दिनकरराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.



यावेळी नवरात्राची तयारी, मागील विकासकामांचा आढावा आणि भाविकांच्या सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस सचिव शरदराव घायाळ, पुजारी मच्छिंद्रबुवा बन महाराज, मंगलताई मोरे, अमोल चौरे, अभयसिंह कदम, झुंजार धांडे, संदीप आदमाने, गणेश गरुड, संदीप माने, अंबादास नवले, संतोष गिरी, कैलास शेजाळ, किशोर गिरी, अजित कदम, संदीप जोशी, बाळासाहेब जगदाळे, श्रीधर करमाळकर, शुभम गिरी व शैलेश गिरी यांच्यासह विश्वस्त उपस्थित होते.

नवरात्रोत्सवानिमित्त मंदिराची रंगरंगोटी, आकर्षक रोषणाई आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. घटस्थापनेच्या दिवशी सकाळी सहा वाजता महाभिषेक होणार असून, त्यानंतर घटस्थापना करून नवरात्रोत्सवाला प्रारंभ होईल. सर्व धार्मिक कार्यक्रम व विधी तुळजापूरच्या परंपरेनुसार पार पडणार आहेत.

नवरात्र काळात पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत बीड शहरासह ग्रामीण भागातील भाविक दर्शनासाठी येतात. पहाटे साडेपाच वाजता आरती, रात्री आठ वाजता महाआरती आणि सायंकाळी सात वाजता आईसाहेबांचा पालखी छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे.

भाविकांच्या सुविधेसाठी दर्शन रांगेत बॅरिकेड्स, मंदिर परिसर व बाहेरील रस्त्यावर सीसीटीव्ही

# आदित्य कृषी महाविद्यालयात 'एनएसएस' स्थापना दिन उत्साहात

## सेवाभावाची प्रेरणा; स्वच्छता, वृक्षारोपण व कृषी जागृती उपक्रमांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) स्थापना दिवस विविध सामाजिक, पर्यावरणपूरक व प्रबोधनात्मक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकासाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक



सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी विशेष स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. स्वच्छता ही दैनंदिन सामाजिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात

### 'मी नाही, पण तुम्ही' या तत्त्वातून समाजसेवा : प्राचार्य भुतडा

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रा. कदम एस. आर. यांनी प्रास्ताविकातून एनएसएस ची उद्दिष्टे मांडली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रा. श्याम भुतडा यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'मी नाही, पण तुम्ही' या ब्रीदवाक्याचा अर्थ विशद केला. कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञान न घेता आधुनिक कृषी तंत्रज्ञान, शाश्वत व सेंद्रिय शेती पद्धतीचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले.

# गाव स्वच्छतेसाठी ग्रामस्थ एकवटले : नांदडी येथे महाश्रमदान; घंटागाडीचा लोकार्पण सोहळा उत्साहात

अंबाजोगाई, प्रतिनिधी : जिल्हा परिषद विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'एक दिन, एक घंटा, एक साथ' या महाश्रमदान अभियानाला अंबाजोगाई तालुक्यातील नांदडी येथे ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामस्थ, महिला, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येत गावातील चौक, शाळा व मंदिर परिसराची स्वच्छता केली.

या महाश्रमदानात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी, बचत गटातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या





संख्येने सहभागी झाले. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या संकल्पनेतून ग्रामस्थांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

यावेळी गावातील प्रत्येक कुटुंबाला कचराकुंडीचे वाटप करण्यात आले. तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून उपलब्ध झालेल्या घंटागाडीचा लोकार्पण सोहळा सरपंच सौ. महादेवी बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास उपसरपंच बालाजी देशमुख, ग्रामपंचायत सदस्य कुलदीप देशमुख, आकाश वाघमारे, उत्तरेश्वर देशमुख, प्रीतम वाघमारे, आशाताई शिवनंदा वाघमारे, अंगणवाडी कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेच्या सहशिक्षिका प्रत्येकीचमे मॅडम, सीआरपी तसेच ज्येष्ठ नागरिक हरिश्चंद्र वाघमारे, प्रकाश वाघमारे, दगडू साहेब देशमुख, किसन गवळी प्रीती किचमे सहशिक्षिका आदी उपस्थित होते. वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी महाश्रमदानात सहभागी

# जीवनात ज्ञानेश्वरी सर्व सुख प्राप्त करुन देते - ह.भ.प. नामदेव म.शेकटेकर

## शिवाजीराव दादांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ज्ञानेश्वरी पारायणास बहुसंख्येने नोंदणी करा

गेवराई । प्रतिनिधी

मानवी जीवनात प्रत्येकाने ज्ञानेश्वरी पारायण केले पाहिजे कारण ज्ञानेश्वरी जीवनात सर्व सुख प्राप्त करुन देते असे प्रतिपादन ह.भ.प.नामदेव महाराज शेकटेकर यांनी येथे केले. माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त गेवराई येथे आयोजित भव्य कीर्तन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांसह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी बहुसंख्येने सहभागी होऊन या अभूतपूर्व आध्यात्मिक आनंदात सामील व्हावे असे आवाहन





अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातचे भाग्यविधाते शिक्षण व सहकार महर्षी माजीमंत्री शिवाजीराव दादा पंडित यांच्या ८९ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त शिवनगरी र.भ. अट्टल महाविद्यालय क्रीडांगण ,गेवराई येथे शनिवार दि.३ ऑक्टोबर ते शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२६ या दरम्यान भव्य कीर्तन

# सेंट झेवियर्सच्या विद्यार्थ्यांचे सायकल स्पर्धेत घवघवीत यश; जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर कब्जा

बीड (प्रतिनिधी) : मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर सेंट झेवियर्स स्कूल, बीडच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय शालेय सायकल स्पर्धेत दमदार कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल केले आहे.

दिनांक १ ऑक्टोंबर रोजी आयोजित १४ वर्षाखालील जिल्हास्तरीय शालेय सायकल स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत सेंट झेवियर्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मुला-मुलींच्या गटात बाजी मारली.



मुलांच्या गटात या शाळेचा विद्यार्थी अरिब खान आगाखान पठाण याने प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले, तर रणवीर भागवत

# स्व. नारायणराव मोटे सरांचे शैक्षणिक कार्य प्रेरणादायी आहे -रणवीर पंडित

## मोटे सरांच्या स्मृती जपणारा उपक्रम; सहावीच्या विद्यार्थ्यांना १५०० कंपास पेट्यांचे वाटप

गेवराई दि.२ (प्रतिनिधी) आदर्श शिक्षक स्वर्गीय नारायणराव मोटे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले काम कधीही विसरणे शक्य नाही, त्यांनी दिलेला विचार आणि संस्कार पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपली आहे. मोटे सरांच्या स्मृतीप्रत्यार्थ शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अकॅडमी चे अध्यक्ष रणवीर



पंडित यांनी केले.

आदर्श शिक्षक स्व. नारायणराव मोटे यांच्या स्मरणार्थ मोटे परिवाराच्या वतीने गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना १५०० कंपास पेट्यांचे वाटप करण्यात आले. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गेवराई येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनाही कंपास पेट्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास शारदा स्पोर्ट्स ॲकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, गेवराईचे गटशिक्षणाधिकारी मयुर मोदानी, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीणकुमार काळम पाटील, विठ्ठल शेमे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष मधुकर तौर, पत्रकार सुशील टकले, केंद्रप्रमुख वैशाली वाघमारे, श्रीमती कांबळे, आसाराम चादर, महेश भोपळे, भागवत भारती, विशाल राऊत यांच्यासह मोटे परिवारातील दिगंबर आर्दड, ओम मोटे, मुक्ता आर्दड (मोटे), राहुल मोटे, अविनाश मोटे, माधव

# राजस्थानी विद्यालयात झाले कायदेविषयक जनजागृती शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

राजस्थानी माध्यमिक विद्यालयात तालुका विधी सेवा समिती माजलगाव व वकील संघ माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिर आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय डी एन चामले साहेब ( दिवाणी न्यायाधीश व स्तर ) तसेच प्रमुख अतिथी माननीय ॲड एन आर गोले अध्यक्ष वकील संघ माजलगाव), माननीय ॲड बी पी शिंदे,ॲड पी व्ही बजाज माननीय शिंदे साहेब( विस्तार अधिकारी माजलगाव ), श्री




पाटील साहेब, ( पंचायत समिती माजलगाव ) माननीय श्री बाळासाहेब सोनसळे सर(जि. प कन्याशाळा माजलगाव) संस्थेचे अध्यक्ष माननीय डॉ. आर जी बजाज साहेब, संस्थेचे सचिव माननीय श्री रामानंदजी लड्डा, संस्थेचे उपाध्यक्ष माननीय मानधने साहेब, संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय रमेशचंद्रजी कासट साहेब शाळेचे मुख्याध्यापक श्री तौर , शिंदे सर हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती होके मॅडम व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जंगले सर यांनी केले या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री सोनसळे सर यांनी पोस्को कायदा तसेच ॲड गोले साहेबांनी समाज सुधारक व कायदेविषयक इतर माहिती सांगितली तसेच अध्यक्ष समारोपात न्यायाधीश चामले साहेबांनी स्त्रीभ्रूणहत्या, बाल लैंगिक कायद्याचे मार्गदर्शन करून श्री डोंगरे सरांनी कार्यक्रमाचे आभार मानले व विद्यालयाच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम शांततेत बसून आस्वाद घेतला.

# उमादेवी मंदिराच्या गाभाऱ्यात फरशी बसवून देत तुकाराम गोरे यांचा पुढाकार

बीड (गेवराई) : उमापूर येथील प्रसिद्ध उमादेवी मंदिराच्या गाभाऱ्यात तुकाराम बप्पासाहेब गोरे यांनी स्वखर्चाने फरशी बसवून दिली. तुकाराम गोरे हे उमापूरचे मूळ रहिवासी असून, अनेक वर्षांपासून कामानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे स्थायिक आहेत. तुकाराम गोरे आणि त्यांचे मोठे बंधू ज्ञानेश्वर गोरे यांनी स्वतः जातीने लक्ष घालून काम पूर्ण करून घेतलं.

गावाशी असलेले नाते जपत त्यांनी धार्मिक स्थळाच्या विकासासाठी हा उपक्रम राबविला. मंदिराच्या गाभाऱ्यात फरशी बसविण्यात आल्याने भाविकांना अधिक स्वच्छ व सुटसुटीत सुविधा



उपलब्ध झाली आहे. त्यांच्या या सामाजिक व धार्मिक योगदानाचे ग्रामस्थ आणि भाविकांकडून कौतुक होत आहे.